दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
● वर्ष १५ वे ● अंक ३०३ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.२६ जानेवारी २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## लोकल रेल्वे सेवा सर्वांसाठी सुरु करण्याचा निर्णय लवकरच : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबईतील लोकल रेल्वे सेवा सर्वांसाठी सुरु करण्यासंदर्भात मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत आढावा घेण्यात आला. यासंदर्भातील निर्णय लवकरच घेण्यात येईल अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. बैठकीस मुख्य सचिव संजय कुमार, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सल्लागार अजोय मेहता, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आशिषकुमार सिंह, प्रधान सचिव विकास खारगे, सचिव आबासाहेब जराड, बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त इक्बालसिंह चहल, आपत्ती व्यवस्थापन संचालक अभय यावलकर यांच्यासह मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक संजीव मित्तल, आणि पश्चिम रेल्वेचे महाव्यवस्थापक आलोक कंसल, मुंबई पोलीस आयुक्त परम बीर सिंह, यांच्यासह आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव अद्याप संपलेला नसल्याने गर्दी होणार नाही अशा पद्धतीने लोकल सेवा सर्वांसाठी कशाप्रकारे सुरु करता येईल यादृष्टीने विविध पर्यायांवर बैठकीत चर्चा करण्यात आली.

# शेतकऱ्यांबरोबर कामगारांची देखील केंद्र सरकारकडून हेळसांड : ना.जयंत पाटील

## भव्य जलसंपदा भवनाच्या इमारतीचा लोकार्पण सोहळा संपन्न

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

रायगड जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण असलेल्या माणगांव तालुक्यात भव्य जलसंपदा भवनाच्या इमारतीचा लोकार्पण सोहळा महाराष्ट्र राज्य जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री ना. जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत खा. सुनील तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.



यावेळी राज्यमंत्री तथा रायगड जिल्हा पालकमंत्री ना. आदिती तटकरे यांनी बोलताना सांगितले की, काही शासकीय प्रकल्प प्रलंबित आहेत. ते लवकरात लवकर राज्य शासनाने रायगड जिल्ह्याला प्राधान्य देऊन पूर्ण करावीत अशी मागणी केली. तसेच महाड, पोलादपूर,माणगांव विधानसभा आ. भरत गोगावले यांनी कुंभे जल प्रकल्प व पन्हाळघर धरणाचे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे आणि तेथील नागरिकांचा पुनर्वसनाचा तिढा देखील सोडवावा अशी विनंती केली. कोकण स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद आ. अनिकेत तटकरे यांनी महाड येथील शेतकऱ्यांचे प्रश्न मांडले. खा. सुनिल तटकरे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, या जलसंपदा भवनाचे काम ना. जयंत पाटील यांच्या सहकार्यानेच पूर्ण झाले. ते पुढे म्हणाले माणगांव शहराशी माझे अतूट नाते आहे. माणगांव शहरात काळ नदीवर माणगांवकरांच्या पिण्याचा पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी बंधारा होणे गरजेचे आहे. तसेच माणगांव शहरातून जो १ किमी अंतराचा कालवा गेलेला आहे त्याची सुद्धा दुरुस्ती होणे गरजेचे आहे. कोकणातील पाणी हे इतरत्र न वळवता फक्त कोकणामध्येच पाण्याचे योग्य पद्धतीने विस्तार, वाटप व संधारण व्हावे. खा. शरद पवार यांनी म्हटल्याप्रमाणे कोकणाचा कॅलिफोर्निया कसा करता येईल यावर जास्तीत जास्त भर देऊन कोकणाला प्रगती पथावर कसे नेता येईल याचा पुरेपूर प्रयत्न प्रामाणिकपणे करणार असल्याचे खा. सुनील तटकरे यांनी सांगितले.

पुढे महाराष्ट्र राज्य जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री ना. जयंत पाटील यांनी बोलताना सांगितले की, कोकण विविधतेने नटलेला अपार निसर्ग सानिध्य लाभलेला व पर्यटनासाठी उत्तम असा महाराष्ट्रातील एक भाग आहे. जलसंपदा भवनाचे पूर्ण श्रेय हे खा. सुनील तटकरे यांना जाते. अलिबागमधील सांबरखिंड प्रकल्प एक महिन्याच्या आत मार्गी लागेल. तसेच कुंभे जलप्रकल्प व पन्हळघर येथील बंधाराचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी बैठक घेऊन योग्य तो निर्णय घेतला जाईल. माणगांव शहरासाठी काळनदीवर उत्तम नियोजन करून पर्यावरणाच्या दृष्टीने सोयीस्कर असा बंधारा बांधण्यात येण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. तसेच शहरातील कालव्याचे अंतर्गत पाईप टाकून किंवा बांधकाम करून दुरुस्तीसुद्धा करण्यात येईल. पूर्वी रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री पद असताना त्यांनी दिवेआगर व हरिहरेश्वर येथे आले असतानाच्या आठवणींना सुद्धा उजाळा दिला. दिल्लीत बसलेल्या सरकारने शेतकऱ्यांसोबत कामगारांची देखील हेळसांड केली ही पंतप्रधानांची जनतेवरील कृपा आहे, असा टोला देखील त्यांनी लगावला. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे सुद्धा राज्याचा गाढा उत्तमरित्या सांभाळत आहेत. खा. शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कोकणला अजून कसे समृद्ध करता येईल यावर राज्य सरकार भर देत आहे. या लोकार्पण सोहळ्याला रा. काँ. जिल्हा अध्यक्ष सुरेश लाड, जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुधाकर घारे, जिल्हा परिषद सभापती, माणगांव पं. स. सभापती अल्का जाधव, माणगांव नगर पंचायत नगराध्यक्षा योगिता चव्हाण, महाड, पोलादपूर, माणगांव विधानसभा अध्यक्ष बाबू खानविलकर, जलसंपदा विभागाचे अधिकारी आदी राष्ट्रवादी पक्षाचे कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त...

### १ फेब्रुवारीला शेतकऱ्यांचा मोर्चा संसदेवर धडकणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

कृषी कायद्यांविरोधातील शेतकरी आंदोलन गेल्या ६० दिवसांपासून दिल्ली सीमेवर सुरूच आहे. याच आंदोलनातंर्गत शेतकऱ्यांनी २६ जानेवारीला म्हणजेच 'प्रजासत्ताक दिनी' ट्रॅक्टर रॅली काढून आपला निषेध नोंदविण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. दरम्यान, दिल्ली पोलिसांकडून ट्रॅक्टर रॅलीसाठी परवानगी मिळाल्यानंतर आता दिल्ली सीमेवर आंदोलन करणारे क्रांतिकारक शेतकरी संघटनेचे नेते दर्शन पाल यांनी सोमवारी सांगितले की, १ फेब्रुवारीला शेतकऱ्यांकडून संसदेवर पायी मोर्चा काढण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, बजेट सत्राचा पहिला टप्पा २९ जानेवारी ते १५ जानेवारी दरम्यान चालणार असून १ फेब्रुवारीला केंद्र सरकार आपले बजेट सादर करणार आहे. याआधी केंद्रीय कृषीमंत्री नरेंद्रसिंह तोमर यांनी सोमवारी एएनआयशी संवाद साधताना सांगितले की, प्रजासत्ताक दिनाखेरीज इतर कोणताही दिवस ट्रॅक्टर रॅलीसाठी निवडला असता, पण आता त्यांनी जाहीर केले आहे. अशा परिस्थितीत शेतकरी व पोलीस प्रशासनासमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे कोणतीही घटना घडू न देता शांततापूर्वक ट्रॅक्टर रॅली पार पाडली पाहिजे. तसेच, शेतकरी आंदोलन कधी संपेल या प्रश्नावर केंद्रीय कृषीमंत्री नरेंद्रसिंह तोमर की आंदोलन लवकरच संपेल. प्रत्येकाला आपला विरोध दर्शविण्याचा अधिकार आहे, आम्ही ज्यावेळी पाहिले शेतकऱ्यांची एक अल्प संख्या कृषी कायद्याच्याविरोधात आंदोलन करत आहे. त्यावेळी आम्ही त्यांच्या समस्या ऐकण्याचा प्रयत्न केला आणि हा मुद्दा चर्चेच्या माध्यमातून सोडवण्याचा प्रयत्न केला. तसेच, हा मुद्दा होईल लवकरच सोडविला जाईल, असे मत केंद्रीय कृषीमंत्री नरेंद्रसिंह तोमर यांनी व्यक्त केले.

**जमीन विकणे आहे**

पाली–खोपोली मार्गावर नानोसे गावाजवळील पेट्रोल पंपाच्या समोर असलेली रोड टच २१ गुंठे शेतजमीन जागा विकणे आहे.

संपर्क : 8108618486

## उपजिल्हा रुग्णालयात नॉन कोव्हिड रुग्णांनाही आरोग्य सेवा द्या : आ.प्रशांत ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल येथील महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उप जिल्हा रुग्णालयात कोव्हिड व नॉन कोव्हिड रुग्णांनाही आरोग्य सेवा देऊन त्यांच्यावर उपचार करण्यात यावेत अशी मागणी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी रायगड जिल्हाधिकार्यांकडे केली आहे.



पनवेल येथील महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उप जिल्हा रुग्णालयात तत्कालीन परिस्थिती पहाता कोव्हिड रुग्णावर उपचार करणे गरजेचे होते. त्यामुळे रायगड जिल्हाधिकार्यांनी एप्रिल २०२० मध्ये हे रुग्णालय कोव्हिड रुग्णालय घोषित केले होते. ते अद्याप पर्यंत कोव्हिड रुग्णालायच असल्याने या रुग्णालयात इतर रुग्णावर उपचार करण्यात येत नाहीत. त्यामुळे गरजू व गरीब इतर रुग्णांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. यामुळे आमदार प्रशांत ठाकूर यांनी रायगड जिल्हाधिकार्यांकडे पत्र देऊन येथे इतर रुग्णांवर उपचार करण्यास व त्यांना आरोग्य सेवा देण्याचा निर्णय घेऊन तसा आदेश देण्याची मागणी केली आहे. आमदार प्रशांत ठाकुर यांनी रायगड जिल्हाधीकार्यांना दिलेल्या पत्रात सद्यस्थितीत कोव्हिड रुग्णांची संख्या कमी होत असून अशा परिस्थितीत गरजू व गरीब इतर रुग्णांना आरोग्य सेवा मिळण्यास येणाऱ्या अडचणी दूर होण्यासाठी कोव्हिड रुग्णांबरोबरच नॉन कोव्हिड रुग्णांनाही वैद्यकीय उपचार व सेवा सुरू करणे अत्यंत आवश्यक आहे. उप –संचालक आरोग्य सेवा , ठाणे यांनी ६ जानेवारी २०२१ रोजी या रुग्णालयाला भेट दिली असता येथे कोव्हिड रुग्णांबरोबरच नॉन कोव्हिड सेवा सुरू करणे बाबत उपजिल्हा रुग्णालयाच्या संबंधित अधिकार्यांना सूचित केले होते. त्यामुळे आपण याचा विचार करून आपल्या स्तरावर उचित निर्णिय घेऊन तसे आदेश द्यावे अशी मागणी रायगड जिल्हाधिकार्यांकडे केली आहे.

## केंद्र शासनाच्या योजना शहरी व ग्रामीण भागातील जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत : खा.श्रीरंग बारणे



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

केंद्र शासनाच्या अनेक महत्वाकांक्षी योजना असून त्यांची अंमलबजावणी करुन जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागा–तील जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, असे निर्देश खासदार तथा अध्यक्ष जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण (दिशा) समिती श्रीरंग बारणे यांनी आज येथे दिले. जिल्हा नियोजन भवन सभागृहात आयोजित जिल्हास्तरीय जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण (दिशा) समितीच्या बैठकीत ते बोलत होते.

यावेळी खासदार सुनिल तटकरे, आमदार सर्वश्री आ.रविशेठ पाटील, आ.प्रशांत ठाकूर, आ.महेंद्र दळवी, जिल्हा परिषद अध्यक्ष श्रीमती योगिता पारधी, जिल्हाधिकारी निधी चौधरी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे तसेच सर्व शासकीय यंत्रणांचे प्रमुख अधिकारी,कर्मचारी, जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण (दिशा) समितीचे सदस्य उपस्थित होते.

खा.श्री.बारणे पुढे म्हणाले की, जिल्ह्यातील जनतेसाठी केंद्र शासन अंगिकृत असलेल्या अनेक योजना शासन राबवित असून या योजनांच्या अंमलबजावणीसाठी व्यापक प्रमाणावर जनजागृती करणे आवश्यक आहे. महात्मा गांधी रोजगार हमी योजना, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, राष्ट्रीय सामाजिक मदत कार्य, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी), स्वच्छ भारत मिशन अभियान, राष्ट्रीय ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, डिजिटल इंडिया भूमी अभिलेख कार्यक्रम,

..../२

## सिडकोच्या खारघर येथील निवासी तथा वाणिज्यिक भूखंडांना प्राप्त झाले विक्रमी दर

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

**सिडकोच्या तिजोरीत ९१ कोटींची भर**

सिडको महामंडळातर्फे ई–लिलाव व ई–निविदा प्रक्रियेद्वारे खारघर येथील एकूण ४ निवासी तथा वाणिज्यिक भूखंडांच्या भाडेपट्ट्यावर विक्री योजनेस निविदाकारांचा उत्तम प्रतिसाद लाभून सदर भूखंडांना विक्रमी दर प्राप्त झाला आहे. योजना पुस्तिकेतील वेळापत्रकानुसार संपूर्ण प्रक्रिया पार पडून २५ जानेवारी २०२१ रोजी ऑनलाईन माध्यमातून ई–निविदा उघडण्यात आल्या व ई–लिलाव प्रक्रियेमधील बोलींची तुलना करण्यात येऊन यशस्वी निविदादारांची नावे जाहीर करण्यात आली आहेत. या भूखंड विक्रीतून सिडकोच्या तिजोरीत अंदाजे रू. ९१ कोटींची भर पडली आहे.

खारघर येथील सेक्टर १६ मधील क्र. ८ ए या भूखंडाची आधारभूत रक्कम रू. ६०,९३९/– प्रति चौ. मी. होती व या भूखंडास रू. १,४१,९८७/– प्रति चौ. मी., खारघर येथील सेक्टर १६ मधील क्र. ९ या भूखंडाची आधारभूत

..../२



## PUBLIC NOTICE

**Description of Flat**

| Plot No. & Place/Node | Flat No. and Building Name | Sector No. | Area in Sq. Feet & Sq. Meters | Parking No. |
|---|---|---|---|---|
| Plot No. Plot No. 32, Kharghar, Navi Mumbai, Tal. Panvel & Dist. Raigad. | Flat No. 1401,"A" Wing on 14th Floor,, Building Name: - "ADHIRAJ GARDEN (AQUA·'A' WING) CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LTD." | 5, Kharghar, Navi Mumbai. | adm. Carpet area of 77.96 Square Meters/839.21 Square Feet (which is equal to build up area of 90.66 Square Meters/975.83 Square Feet and Saleable area of 116.96 square Meters/1259 square feet). | Covered Car Parking Space No. P2-134. Building Name: - "ADHIRAJ GARDEN (AQUA 'A' WING) CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LTD." |

NOTICE is hereby given to the Public at large on behalf of my client Shri.·Dnyaneshwar Dattatraya Takmoge have to agree to Purchase the aforesaid Flat No. 1401, "A" Wing on 14th Floor, Building Name: - "ADHIRAJ GARDEN (AQUA 'A' WING) CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LTD.", Plot No. 32, Sector-05, Kharghar, Navi Mumbai from the owners of the aforesaid Flat Shri. Shalesh Govind Mirchandani and Smt. Taruna Shalesh Mirchandani. Shri. Shalesh Govind Mirchandani and Smt. Taruna Shalesh Mirchandani are the Owners of the aforesaid Flat No. 1401, "A" Wing on 14th Floor, Building Name: - "ADHIRAJ GARDEN (AQUA 'A' WING) CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LTD.", Plot No. 32, Sector-05, Kharghar, Navi Mumbai and they are agreed to sale the aforesaid flat along with Covered Car Parking No. P2-134to my client Shri. Dnyaneshwar Dattatraya Takmoge.

All persons including individuals, a Hindu undivided family, company (ies), bank, financial institution(s), non-banking financial institution(s), firms, association of persons or body of individuals whether incorporated or not, lenders and/or creditors having any objection, claim, right, title and/or interest in respect of the said immovable Flat/Property or any part or portion thereof by way of Agreement for Sale, Sale Deed, Transfer Agreement, Memorandum of Understanding, exchange, Mortgage, pledge, Charge, Gift, Lease, Easement, license, use, Trust, possession, inheritance, succession, tenancy, maintenance, bequeath, share, assignment, lien, attachment, lis-pendens, agreement, or any liability or commitment or demand of any nature whatsoever, are hereby requested to inform the same in writing, supported with the original documents, to the undersigned at the address mentioned below within a period of 10 (Ten) days from the date of the publication of this notice, failing which the claim(s) of such person/s, if any will be considered as abandoned, surrendered, relinquished, released, waived and not binding on our client and appropriate title certificate may be issued without any further reference.

**VIPINCHANDRA R. KASLE,**
**Advocate High Court**
**Chawla Complex Premises Society Ltd.**
**Office No. 215 on 2nd Floor, Plot No.38,**
**Sector-15, Opp. Vashi Court at Belapur.**
**Belapur C.B.D., Navi Mumbai.**
**(Mobile No. 09920129017.)**

# पोलिसांचे नागोठण्यातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

दै.रायगड नगरी । वाकण

रायगड जिल्ह्यात सध्या रायगड जिल्हा पोलिसांच्या वाहतूक शाखे कडून संपूर्ण जिल्ह्यात विविध उपक्रमांद्वारे ३२ वा रस्ते सुरक्षा अभियान राबविण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून कोकण एज्युकेशन सोसायटीच्या येथील बापूसाहेब देशपांडे विद्या संकुलातील विद्यार्थ्यांना रस्ते सुरक्षा वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत नागोठणे पोलिस ठाण्यातील वाहतूक शाखेचे पोलीस हवालदार प्रमोद कदम व पोलिस हवा–लदार दिपक चव्हाण यांनी वा–हतूक नियमांचे पालन व रस्ता सुरक्षा अभियान या संदर्भात शालेय मुलांना मार्गदर्शन केले. विद्यासंकुलातील शिक्षक व विद्यार्थी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हा वाहतूक शाखा, अलिबाग–रायगडचे पो–लीस निरीक्षक रविंद्र शिंदे, नागोठण्याचे पोलीस निरीक्षक दादासाहेब घुटुकडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा ३२ वा रस्ते सुरक्षा अभियान विविध उपक्रमांनी साजरा करण्यासाठी नागोठणे पोलिस ठाण्यांतर्गत असलेल्या वाहतूक शाखेचे सहाय्यक फौजदार गणेश पवार, पोलीस हवालदार दीपक चव्हाण, पो–लीस हवालदार जीवन आवळे, पोलीस कॉन्स्टेबल विजय पाटील आदींसह वाहतूक शाखेचे सर्व पोलिस कर्मचारी मेहनत घेत आहेत.

# तळा नगरपंचायतीत भाजपाचा जय होणार? माजी सरपंच सौ.दिव्या रातवडकर भाजपमध्ये

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा नगरपंचायत लागण्यापूर्वी अजुनही काही राजकीय भुकंप होण्याची चिन्हे असुन काही जण भाजपाचा जय होणार म्हणणार असल्याची चिन्हे आहेत परिणामी भविष्यात तळा नगरपंचायतीमध्ये सत्ताकारणात उलथापालथ होणार आहे. या राजकीय घडामोंडीमुळे भाजपाच्या गोटात उत्साहाचे वातावरण पसरले आहे.

ॲड.सौ.दिव्या रातवडकर, ड.निलेश रातवडकरांमुळे समीकरणे बदलणार तळा तालुक्यात भाजपाने मुसंडी मारण्यास सुरवात केली आहे.काही ग्रामपंचायतीवर आपले सरपंच निवडुन आणल्यानंतर आता मात्र तळा ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच ड.सौ.दिव्या रातवडकर आणि ॲड.निलेश रातवडकर या दांपत्याला भाजपाने आपल्या पक्षात खेचुन घेतल्याने भाजपा तळा नगरपंचायतीवर आपली सत्ता आणणार असा विश्वास तळा तालुका भाजपा अध्यक्ष कैलास पायगुडे यांनी व्यक्त केला आहे.

तळा ग्रामपंचायत ते नगरपंचायत स्थापनेपासुन शिवसेनेचा बालेकिल्ला राहीला आहे. आता मात्र पहील्यांदाच भाजपाने तळा शहरात राजकीय चाणक्य म्हणुन ओळख असणारे ॲड.निलेश रातवडकर आणि त्यांच्या पत्नी माजी सरपंच ड. सौ. दिव्या रातवडकर आणि त्यांचे सहकारी यांनी मुंबई येथे विरोधी पक्ष नेते आ.प्रविण दरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला यावेळी भाजपा तळा तालुका अध्यक्ष कैलास पायगुडे, माणगाव तालुका अध्यक्ष अप्पा ढवळे, शहर अध्यक्ष सुधीर तळकर, श्री.लोखंडे, क्ल्पेश रातवडकर, दुर्गेश रातवडकर, राकेश रातवडकर आदि मान्यवर उपस्थित होते.या पक्ष प्रवेशामुळे तळा नगरपंचायतीत भाजपाची ताकद लक्षणीय वाढली आहे. नगरपंचायतीत भाजपाचे कमळ फुलण्याची आशा उंचावली आहे.ॲड.निलेश रातवडकर आणि त्यांच्या पत्नी माजी सरपंच ड. सौ.दिव्या रातवडकर यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर तळा नगरपंचायतीतील राजकीय घडामोडींना वेग घेतला आहे.आज शहरातील राजकीय वातावरण ढवळून निघ–ाले आहे. रातवडकर यांच्याप्रमाणेच आणखी कोण भाजपमध्ये प्रवेश करणार याबाबत चर्चा होत आहेत.

शासनाने तालुक्याचे मुख्यालय असलेल्या ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रूपांतर केले जेणेकरुन त्या शहराचा विकास व्हावा अशी अपेक्षा होती मात्र ज्याप्रमाणे तळा नगरपंचायतीचा कारभार चालु आहे त्यापेक्षा ग्रामपंचायत बरी होती असे मत नागरीकांकडुन व्यक्त केले जात आहे.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते आम्ही मौजे : वेश्वी, ता.उरण, जि.रायगड येथील खाली नमूद केलेली मिळकत खिमेन व्योमेश शहा यांजकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| वेश्वी, ता.उरण, जि.रायगड | २९/१४ | ०–२९–० पो.ख.०–००–०० | ०.९४ |

तरी सदर मिळकतीचे बाबतीत अथवा तिच्या कोणत्याही हिश्श्याचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, ॲटॅचमेंट, लीन, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा वगैरे कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आम्ही सदर मिळकतीचे विक्री व हस्तांतरणाचे व्यवहार पूर्ण करू व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दि.२५/१/२०२१

**सही/–**
**कनू एम.ठक्कर**
**७, राधा निवास, ७ राजावाडी रोड,**
**घाटकोपर (पू), मुंबई–४०००७७**
**मो.नं.९३२२५५१४१४**

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, माझे अशिल जयंतीलाल चुनीलाल ठक्कर, राहणार : बी१/६०६, लोक भारती को.ऑप.हौ.सो.लि., मरोल, अंधेरी–पूर्व, पो.जे.बी.नगर, मुंबई–४०००५९ आणि सुनील प्रेमजी पटेल, राहणार : बी–३०२, घनश्याम विजय को.ऑप.हौ.सो.लि., विजय नगर, मरोल, अंधेरी–पूर्व, पो.जे.बी.नगर, मुंबई–४०००५९ खाली तपशिलाप्रमाणे असलेली मिळकत या मिळकतीचे मालक श्री.संजय मोतीराम मयेकर यांचेकडून घेण्यास इच्छुक आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे : रेवदंडा, तालुका : अलिबाग, जिल्हा : रायगड

| भोगवटादाराचे नाव | भूमापन क्र. व उपविभाग | भूधारणा पद्धती | क्षेत्र हे.आर.प्रति | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| संजय मोतीराम मयेकर | २२७/१२/२ | भोग वर्ग–१ | ०–२०–८० | ४.४२ |
| | | पैकी विक्री क्षेत्र | ०–०५–०० | |

तरी सदर वर नमूद केलेल्या मिळकतीवर गहाण, दान, बक्षिस, कुळ वहिवाट, कब्जेकरार, भाडेकरार, साठेकरार, विकास कारनामा, खरेदीखत, देखभाल, हवाला, ताबा, सुविधाधिकार, वारसा हक्क, वगैरेद्वारे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही हक्क, हितसंबंध, दावा किंवा मागणी असणाऱ्या व्यक्तींनी तो लेखी स्वरुपात संबंधित कागदपत्रांसहीत खाली सही करणार यांचेकडे खाली दिलेल्या पत्यावर आजच्या जाहीर नोटीस प्रसिद्धीच्या तारखेपासून ०७ दिवसात कळवावेत. वरील मुदतीत कोणाच्याही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार वा हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी त्या सोडून दिल्या आहेत असे समजून माझे अशिल सदर वर नमूद केलेल्या मिळकतीबाबतचा व्यवहार श्री.संजय मोतीराम मयेकर यांचेबरोबर करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**ॲड.अवंतिका बी.देशकर**
**ऑफिस नं.१३, पहिला मजला, यशोकिरण सोसायटी, सावरकर चौक, लोखंडीपाडा, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६**

# हरवलेली मुलगी २ तासात शोधण्यात दादर सागरी पोलिसांना यश

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील हमरापूर गावात आपल्या परिवारासोबत वीटभट्टी कामासाठी आलेल्या व अचानक हरवलेल्या निकिता नाईक या ११ वर्षीय मुलीस २ तासात शोधण्यात दादर सागरी पोलिसांना यश आले आहे.

सविस्तर वृत्त असे की, पेण तालुक्यात विटभट्टीचे उत्पादन जोरात सुरू असते. आणि या रोजगारासाठी दरवर्षी प्रमाणे हिवाळा सुरू झाल्यानंतर बाहेरील जिल्ह्यातील अनेक कुटुंब पेण तालुक्यातील अनेक गावांत येत असतात. याच रोजगाराच्या शोधात अलिबाग तालुक्यातील खंडाळा गावातील नितीन नाईक कुटुंब वीटभट्टी कामासाठी हमरापूर गावात आले आहेत. त्यांचं वीटभट्टीचे काम ही सुरू आहे. मात्र कालच्या संध्याकाळी त्यांची ११ वर्षीय निकिता नितीन नाईक ही मुलगी खाऊ आणण्यासाठी हमरापूर गावात गेली असता ती उशिरा आल्याने तिचे वडील तिला ओरडल्याने ती रात्री ८ च्या सुमारास घरातून रागात निघून गेली. बिबट्याच्या अफवेची दहशत आणि रात्रीचे ११ वाजले तरी आपली मुलगी घरी न आल्याने तिची आई शांता नाईक हिने थेट जोहे गावातील दादर सागरी पोलीस स्टेशन गाठले. व मुलगी हरवल्याची तक्रार दिली.

मुलगी हरविल्याची तक्रार येताच दादर सागरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुहास आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली उप पोलीस निरीक्षक के.आर.भऊड, सहाय्यक फौजदार शिवाजी म्हात्रे, हवालदार रवी मुंडे, जगताप, होमगार्ड आदेश पाटील, करे यांच्या पथकाने अपघातग्रस्तांचे वाली कल्पेश ठाकूर यांच्या सहकार्याने हमरापूर जंगल भागात शोधा शोध सुरू केली. मात्र घरी गेलो तर वडील मारतील या भीतीने निकिता ही झाडांच्या मागे घाबरून लपून बसलेली सापडली. तिला ताब्यात घेऊन व धीर देऊन तिच्या आईच्या ताब्यात सुखरूप देण्यात आली.

रात्रीच्या अंधारात फक्त २ तासात सदर मुलीला शोधल्याने दादर सागरी पोलीस स्टेशनचे अधिकारी, पोलीस कर्मचारी व देवदूत कल्पेश ठाकूर यांचे नाईक परिवार व ग्रामस्थांकडून आभार मानण्यात आले.


## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

दैनिक रायगड नगरी

जाहिरातीचे उत्तम

या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.

Publish Your Public Notice, Tender Notice, Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'

For Booking....

Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706

Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434

Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com


## कागदपत्रे हरवल्याबाबत जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल रेश्मा राजन बोरकर याचे नावे असलेल्या मिळकत वर्णन अे/१०२/४, सेक्टर क्र.१३, नविन पनवेल, या रूमचे अलॉटमेंन्ट लेटर, पझेशन लेटर, ॲग्रीमेन्ट फॉर सेल (सिडको) चे मुळ दस्त व कागदपत्रे प्रवासात नविन पनवेल क्षेत्रामध्ये गहाळ झालेले आहेत. सदर प्रकाराबाबत खांदेश्वर पोलीस ठाणे याचे कडे मिसींगची तक्रार करण्यात आलेली आहे. सदर हरलेल्या मालमत्तेचा क्र.१२७/२०२१ असा आहे. तरी आमचे आशिलाचे मुळ कागदपत्रे कोणासही कुठेही सापडल्यास अथवा मिळाले असल्यास खाली नमुद पत्यावर पोहच करण्यात यावे. ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसात खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी, अथवा रजिस्टर्ड पोस्टाने मुळ कागदपत्रे पाठविण्यात यावे अगर समक्ष येवून भेटावे याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : २५/०१/२०२१

**सही/–**
**ॲड.सचिन बी.कोंडीलकर,**
**शॉप नं. १४२, म्युनसीपल कॉम्प्लेक्स,**
**जुना भाजी मार्केट जवळ, पनवेल,**
**ता.पनवेल, जि.रायगड. ४१०२०६.**
**मो. ९८३३३०६३६१**

## सावधान नोटीस

**मिळकत वर्णन**

**सिडकोने पुर्नस्थापित करून वाटप केलेला भूखंड**

| भूखंड क्रमांक | नोड | तालुका | क्षेत्र |
|---|---|---|---|
| ७१ | वडघर | पनवेल | २५० चौ.मी. |

भूखंड धारक १) श्री.महादेव धर्मा केणी
२) रोहित महादेव केणी

तमाम लोकांस या सावधान नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, वरील मिळकतीचे मालक/धारक श्री.महादेव धर्मा केणी व रोहित महादेव केणी यांनी मौजे : वडघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील भूसंपादीत केलेल्या मिळकती संदर्भात MOU / समजोता करार श्री.अस्लम अब्दुल मजीद मुन्शी रा.पनवेल यांचे बरोबर दि.९/२/२०१७ रोजी विकसन करारनामा केलेला आहे. यापूर्वी दै.रायगड नगरी या वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटीस दि.१५/०२/२०१७ रोजी दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी जमिनीचे मालक/धारक श्री.महादेव धर्मा केणी व रोहित महादेव केणी यांनी दि.९/२/२०१७ रोजी समझोता करार श्री.अस्लम अब्दुल मजीद मुन्शी रा.पनवेल यांना दिलेले आहे. ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

वरील मिळकती संदर्भात श्री.महादेव धर्मा केणी व २ यांना भूखंडाचे व्यवहार करण्याचे हस्तांतरणाची बोलणी करण्याचे कोणतेही हक्क/अधिकार नसल्याचे सर्व जनतेने नोंद घेण्याची आहे.

सबब सदर मिळकतीचे संदर्भात श्री.महादेव धर्मा केणी व इतर यांचेशी कोणीही कसलाही व्यवहार करू नये. या उपर ही कोणी कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास सदर व्यक्ती कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

तसेच होणाऱ्या नुकसानीस सदर व्यक्ती स्वतः जबाबदार राहतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पनवेल
दि.२५/०१/२०२१

**सही/–**
**अस्लम अब्दुल मजीद मुन्शी**
**रा.शॉप नं.११ अे हायपॉईंट सोसायटी**
**प्रशांत लॉज समोर, पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९७०२११२१००**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसद्वारे सुचित करण्यात येत आहे की, आमच्या अशिल १) सौ.गुलाब काशिनाथ मोकल, रा.बेलपाडा, ता.पनवेल, जि.रायगड यांचे वडिलोपार्जित मालकीची, हिंदू एकत्रित कुटुंबांची, कुळवहिवाटीची व ताबेकब्जातील, शेतजमिन मिळकती मौजे : विंधणे, ता.उरण, जि.रायगड येथील मिळकत आहे ती खालीलप्रमाणे.

मिळकतीचे वर्णन

मौजे : विंधणे, ता.उरण, जि.रायगड

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १७१ | २ | ०–५५–५० पो.ख. ०–०६–२० एकूण ०–६१–७० | ५.०८ |

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन आहे.

या वर्णनाची मिळकत आमचे अशिलांच्या वडिलोपार्जित मालकीची, कुळवहिवाटीची व ताबेकब्जातील असून सदर मिळकतीत आमचे अशिलांचा जन्मजात असा अविभाज्य हिस्सा आहे. सदर मिळकत ही हिंदू एकत्रित कुटुंबाची असून तिचे वाटप झाले नाही. तसेच सदरहू मिळकती संदर्भात उपविभागीय अधिकारी साहेब पन–वेल यांच्या न्यायालयात अपिल दाखल केले आहे. तसेच पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात स्पे.मु. नं.३३९/२०१९ न्यायप्रविष्ट आहे. तरी सदर मिळकतीचा कुठल्याही प्रकाारचा विकासाचा करार, भाडेकरार, लिज, हस्तांतरण विक्री, दान, बक्षिस, गहाण, फरोक्त खत, सदर जागेत बांधकाम अतिक्रमण केल्यास सदरचा कोणताही व्यवहार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. तसेच कोणीही तिऱ्हाईत व्यक्तीने व्यवहार केल्यास त्यास सर्वस्वी परिणामांस जबाबदार तिऱ्हाईत व्यक्ती राहणार आहेत. त्याचप्रमाणे तुम्ही वरील मिळकती संदर्भात कोणताही व्यवहार केल्यास आमचे अशिल तुमच्या विरुद्ध दिवाणी व फौजदारी कारवाईस करतील, याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**ॲड.दिनेश दत्तात्रेय पाटील**
**जय नारायण बिल्डींग, गाळा नं.४,**
**गावदेवी मंदिरासमोर, राम गणेश गडकरी**
**मार्ग, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## भूखंडांना प्राप्त झाले विक्रमी दर

रक्कम रू. ७३,६३५/– प्रति चौ. मी. होती व या भूखंडास रू. १,२७,६३५/– प्रति चौ. मी., खारघर येथील सेक्टर १६ मधील क्र. ९ ए या भूखंडाची आधारभूत रक्कम रू. ६०,९३९/– प्रति चौ. मी. होती व या भूखंडास रू. १,५६,७८९/– प्रति चौ. मी. तर खारघर येथील सेक्टर १६ मधील क्र. ९ बी या भूखंडाची आधारभूत रक्कम रू. ६०,९३९/– प्रति चौ. मी. होती व या भूखंडास रू. १,५६,६९९/– प्रति चौ. मी. असा विक्रमी दर प्राप्त झाला आहे.

सदर योजने अंतर्गत सिडको महामंडळातर्फे नवी मुंबईतील खारघर येथील सेक्टर १६ मधील एकूण ४ भूखंड भाडेपट्ट्यावर विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आले होते. सदर भूखंड हे निवासी/वाणिज्यिक वापराकरिता उपलब्ध होते. सर्व भूखंडांना १.५ चटईक्षेत्र निर्देशांक निश्चित करण्यात आला आहे. ई–लिलाव व ई–निविदा प्रक्रिये अंतर्गत अर्ज नोंदणी, अनामत रकमेचा भरणा, निविदा भरणे या सर्व प्रक्रिया सुलभ, पारदर्शक व जलद अशा ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात आल्या. यामध्ये ऑनलाईन माध्यमातून बंद निविदा सादर केल्यानंतर अर्जदरांना पुढील टप्प्यातील ई–लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होता येणार होते.

बंद निविदेमध्ये उद्धृत करण्यात आलेली बोली किंवा ई–लिलावामध्ये उद्धृत करण्यात आलेली बोली यांपैकी जी बोली जास्त रकमेची असेल ती बोली स्वीकारण्याचा निकष निश्चित करण्यात आला होता. या भूखंड विक्री योजनांच्या माध्यमातून रियल इस्टेट क्षेत्राला नवचैतन्य प्राप्त होऊन विकासकांना प्रगतीची नवी दालने खुली झाली आहेत, असे मत सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांनी व्यक्त केले आहे.

## जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत

पंडित दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजना, प्रधानमंत्री फसल विमा योजना, राष्ट्रीय आरोग्य योजना, सर्व शिक्षा अभियान, एकात्मिक बाल विकास योजना, उज्वल डीस्कोम अशुरन्स योजना, महाराष्ट्र कृषी पंप वीज जोडणी धोरण–२०२०, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण योजना, शालेय पोषण आहार, जलमार्ग विकास कार्यक्रम, प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना, भारत नेट प्रोजेक्ट, पंडित दीनदयाळ अंत्योदय योजना, पंडित दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य विकास योजना त्याचबरोबर रेल्वे, टेलिकॉम, राष्ट्रीय महामार्ग क्षेत्रातील विविध विकास कामे अशा विविध योजनांचा लाभ शहरी तसेच ग्रामीण जनतेला मिळण्यासाठी लोकप्रतिनिधी व शासकीय अधिकारी यांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी उपस्थितांना यावेळी केले. तसेच ग्रामीण व शहरी भागात योजनांची व्यापक प्रमाणावर प्रसिध्दी करावी, लोकप्रतिनिधींशी चर्चा करुन योग्य प्रस्ताव तयार करावेत. योजनांविषयी सूचनांचे फलक प्रत्येक ग्रामपंचायतीत लावावेत, योजनांचे प्रस्ताव कोणकोणत्या स्तरावर प्रलंबित आहेत याची माहिती सादर करावी, जिल्ह्यातील कोणताही पात्र लाभार्थी योजनेपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी, अशा सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या केंद्र शासनाच्या विविध योजना संदर्भातील आढावा त्यांनी यावेळी उपस्थित अधिकारी वर्गाकडून जाणून घेतला. खा.सुनिल तटकरे म्हणाले की, शासकीय अधिकाऱ्यांनी कोणताही आरखडा तयार करताना गरजा,आवश्यक निधी व उपलब्ध निधी याचा बारकाईने अभ्यास करावा, शासकीय यंत्रणेने पुढाकार घेवून जास्तीत जास्त प्रस्ताव सादर व्हावेत, यासाठी विशेष प्रयत्न होणे गरजेचे आहे. तसेच अनेक शासकीय विभागातील रिक्त पदांविषयी चिंता व्यक्त करताना त्यांनी अधिकाऱ्यांनी जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी नियोजनबध्द काम करावे, अशा सूचना दिल्या. बैठकीचे सूत्रसंचलन स्वच्छता व पाणी पुरवठा विभागचे जिल्हा समन्वयक जयवंत गायकवाड यांनी केले. बैठकीच्या प्रारंभी गेल्या वर्षभरात विविध क्षेत्रातील निधन झालेल्या व्यक्तींना दोन मिनिटे स्तब्धता पाळून श्रध्दांजली वाहण्यात आली. तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या व्यक्तींच्या अभिनंदनाचा ठराव मांडण्यात आला. बैठकीची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## कोलाडमध्ये बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्ताने कोरोना योद्धांचा सन्मान

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

शिवसेना शाखा कोलाड विभागा तर्फे २३ जानेवारी शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या ९५या जंयती निमिताने कोलाड विभागातील कोरोना योद्धाचा सन्मान पत्र देवुन सत्कार करण्यात आला

यामध्ये कोलाड मधील सरकारी दवाखान्याचे डॉ चव्हाण, डॉ भोईर मॅडम व परिचारिका याचा व कोलाड. पोलीस ठाण्याततील पोलीस अधिकारी श्री सुभाष आबा जाधव साहेब व महिला पोलीस व इतर पोलीस कर्मचारी यांना सम्मानपत्र देवुन सत्कार करण्यात आला या वेळी शिवसेना कोलाड विभागातील विभाग प्रमुख कुलदीप सुतार, चंद्रकात लोखंडे, महिला आघाडीच्या प्रमुख चेतना लोखंडे, शाखाप्रमुख निलेश गोरीवले, ज्ञानेश्वर खामकर, संदीप माने, गणेश शिदे, ग्रामपंचायत सदस्य पिटयां.जाधव, महेश शिंदे पहुर, व विजय बोरकर मा. कक्ष उपजिल्हाप्रमुख सदर कार्यक्रमाला उपस्थित होते

## म्हसळा येथे राष्ट्रीय मतदार दिन उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

लोकशाही असलेल्या आपल्या देशात प्रत्येक १८ वर्षे वय असलेल्या नागरिकास मतदानाचा अधिकार आहे. त्याची जाणीव करून देण्यासाठी व देशातील नागरिकां मध्ये मतदानाची ईच्छा व जागृती करण्यासाठी शासनातर्फे ठीक-ठिकाणी राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात येतो. या दिनानिमित्त विविध कार्यक्रम राबविण्यात येतात. त्याच अनुषंगाने २५ जानेवारी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त म्हसळा येथील तहसील कार्यालयात मतदारांसाठी शपथ घेण्याचा कार्यक्रम करण्यात आला. तसेच चित्रकला स्पर्धे चे सुद्धा आयोजन करण्यात आले होते. यावेळी नायब तहसिलदार के टी भिंगारे, अनिकेत सोनवणे, अमर ठमके, तहसिल आणी वनविभाग कर्मचारी उपस्थित होते. मतदार असल्याचा अभिमान मतदारास असावा आणि त्यातून बळकट लोकशाहीतील मोठा सहभाग नोंदवता यावा हा या कार्यक्रमाचा उद्देश असून अठरा वर्ष पूर्ण झालेल्या नागरिकांनी मतदार यादीत आपले नाव नोंदवून मतदानाचे कर्तव्य पार पाडून लोकशाही बळकट करावी असे आव्हान तहसीलदार शरद गोसावी यांनी कार्यक्रम प्रसंगी केले.



# पोलादपूर नायक मराठा समाजभवनाची उभारणी अखंडीतपणे व्हावी : खा.सुनील तटकरे

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**



केंद्रसरकारने गेल्या दोन वर्षांचा खासदारांचा साडेबारा कोटींचा विकासनिधी गोठवला नसता तर पोलादपूर तालुक्यातील नायक मराठा समाजभवन एव्हाना मूर्त स्वरूपात दिसून आले असते. जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीमध्ये आ.गोगावलेंसोबत याकामी अधिकाधिक निधी उपलब्ध करून घेत येत्या काही काळातच पोलादपूर नायक मराठा समाजभवनाची उभारणी अखंडीतपणे व्हावी. यासाठी प्रयत्न राहतील, अशी ग्वाही रायगड लोकसभा मतदार संघाचे खासदार सुनील तटकरे यांनी दिली.

चोळई येथील पोलादपूर नायक मराठा समाजभवनाच्या कार्यालयाचे उदघाटन खा.सुनील तटकरे यांच्याहस्ते फित कापून तर आ.भरत गोगावले यांच्याहस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. याप्रसंगी व्यासपिठावर महाडचे आमदार भरत गोगावले यांच्यासह समाजभवनाच्या बांधकाम समितीचे अध्यक्ष चंद्रकांत कळंबे, समाजाचे अध्यक्ष सुनील मोरे, कार्याध्यक्ष मोहन शिंदे, किशोर जाधव, मुंबई विभाग कार्याध्यक्ष सुभाष पवार, वाय.सी.जाधव, संतोष मेढेकर, अनंत पार्टे तसेच अन्य पदाधिकारी व निमंत्रक होते.

यावेळी उदघाटनपर भाषणात खा.तटकरे यांनी पुढे फक्त महाडमध्येच सगळं न्यायचं, रोह्यामध्ये न्यायचं असं चालायचं नाही तर नजिकच्या काळामध्ये पोलादपूर तालुक्यातदेखील एमआयडीसी होण्यासाठी प्रयत्न केले जातील. तालुक्याला ऐतिहासिक आणि भौगोलिक पार्श्वभूमी चांगली आहे. नायक मराठा सेवा संघाच्या मराठा भवन इमारतीसह येथील शहीद जवानाचे होणारे स्मारक हेदेखील येणाऱ्या पिढीसाठी प्रेरणादायी असेल, असे मत खासदार सुनील तटकरे यांनी यावेळी व्यक्त केले. सुत्रसंचालकांनी आमदारांचा उल्लेख गोरगरिबांच्या कैवारी असा केला आणि आपला उल्लेख खासदार असा केला, असे सांगून का तटकरे यांनी, एकटेच गोरगरिबांचे कैवारी आहेत? असा सवाल करीत गेली चाळीस वर्षे आपण पाचवेळा आमदारकी केली, आता खासदारकी करतोय. ते गोरगरिबांना न्याय दिल्याशिवाय शक्य झाले का? यात गंमतीचा भाग सोडला तर आ. भरतशेठ असो वा आपण सातत्याने गोरगरिबांसाठी काम करीत आहोत, म्हणूनच जनता वारंवार निवडून देत आहे, असा 'कहींपे तीर, कहीपे निशाना' खा.तटकरे यांनी साधला. येत्या ६ फेब्रुवारीला जिल्हा विकास व नियोजन मंडळाच्या बैठकीत पालकमंत्री अदिती तटकरे यांच्या समोर या मराठा समाजभवनाच्या उर्वरित कामासाठी निधीची तरतूद करून लवकरच हे काम न थांबता पुर्णत्वास नेऊ, अशी ग्वाही खा. तटकरे यांनी दिली.

याप्रसंगी आ.गोगावले यांनी, पोलादपूर तालुक्यातील विविध समस्यांबाबत पालकमंत्री ना. अदिती तटकरे यांनी विकासाचे झुकते माप देऊ केले असताना खा. तटकरे यांच्या माध्यमातून मराठाभवन ही नायक मराठा समाजाची दिमाखदार वास्तू उभी राहात आहे. ज्यांना सहभागी व्हायचे आहे त्यांनी आपणहून सहकार्य करावे. खासदारांकडे तालुके खुप आहेत ते तेवढी मदत देतील आपण आमदार आहोत आपल्यापरीने हातभार लावू तशाचप्रकारे इतरांनीही यथाशक्ती मदत करावी, असे आवाहन यावेळी केले.

## माथेरान घाटात जीपला अपघात सुदैवाने जीवितहानी नाही

**दै.रायगड नगरी । माथेरान**



नेरळ हुन माथेरानला जाताना येथील वॉटर पाईप रेल्वे स्थानकानजीक एका जीप सुरक्षा भिंतीला धडकल्याने अपघात ग्रस्त झाली आतील प्रवाशांचे दैव बलवत्तर होते म्हणून कोणतीही जीवितहानी झाली नाही.

एमएमआरडीए च्या माध्यमातून नेरळ माथेरान घाट रस्त्याचे काम झाल्यानंतर हा घाट रस्ता नवीन वाहनचालकांसाठी सुरक्षित झाला आहे पण काही शिकाऊ ड्रायवर ह्या घाटा मध्ये गाडी चालविताना अनेकवेळा फसत असतात व अपघाताला आमंत्रण देत असतात. माथेरान घाटामध्ये अनेक ठिकाणी चढणीच्या ठिकाणी धोकादायक वळणे आहेत त्यामुळे येथे शिकाऊ वाहनचालक फसण्याचे प्रमाण अधिक आहे आज मुंबई हुन माथेरानला फिरण्यासाठी काही कुटुंबे आपआपल्या गाड्यांमधून आली होती त्यामध्ये एम एच ०३ ६६६६ ह्या क्रमांकाची जिप्सी ही होती त्यामध्ये चालकासह तीन महिला प्रवासी प्रवास करीत होत्या आज रविवार असल्याने नेरळ माथेरान घाटामध्ये वाहनांची वर्दळ अधिक असल्याने येथील वॉटरपाईप रेल्वे स्थानकानजीक असलेल्या एस आकाराच्या अवघड वळणावर वाहनचालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने गाडी रस्ता सोडून सुरक्षा रेलिंगवर जाऊन धडकली ही धडक इतकी जबरदस्त होती की गाडी सुरक्षा कठड्याच्या वर चढली व रस्ता व दरीच्या मध्ये झोका घेऊ लागली त्यामुळे आतील प्रवासी घाबरून गेले होते पण त्यावेळी त्यांच्या दुसऱ्या गाड्यातील सहकाऱ्यांनी प्रसंगाचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने आतील प्रवाशांना बाहेर काढले ह्याच ठिकाणी काही वर्षांपूर्वी असाच अपघात झाला होता व तेव्हाही गाडी हवेमध्ये झुलत होती त्यामुळे हे ठिकाण अपघात प्रवन वळण झाले असून अनेकवेळा दुचाकी वाहने देखील येथे अपघातग्रस्त होत असतात. ह्या ठिकाणी अपघात झाल्यानंतर हे कुटुंब इतर नातेवाईकांबरोबर माथेरानमध्ये निघून गेल्याने अपघातग्रस्त कुटुंबची माहिती मिळाली नसली तरी प्रत्यक्षदर्शी पाहणाऱ्या नि सांगितल्याप्रमाणे दैव बलवत्तर म्हणून सर्व प्रवाशी वाचल्याचे सांगितले जीप खोल दरी वर झुलत होती व सहकार्याने आपला जीव धोक्यात घालून आतील प्रवाशांना बाहेर काढल्याचे सांगितले ही जीप जर कठड्यावर अडकली नसती तर खोल दरीत कोसळली असती व ह्यामध्ये मोठी प्राणहानी झाली असती त्यामुळे गर्दीच्या दिवसांमध्ये घाटामध्ये बेशिस्तपणे वाहन चालविणार्यावर नजर ठेवण्यासाठी पोलिस गस्त सुरू करावी अशी मागणी जोर धरू लागली आहे

## निवडणूक कामाचे मानधनासाठी तहसिलदारांना शिक्षक संघटनेचे निवेदन

**दै.रायगड नगरी । उरण**



उरण तालुक्यात झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत शिक्षकांनी केंद्रात केंद्रप्रमुखांची जबाबदारी उत्तम रित्या पार पाडली आहे. त्या शिक्षकांचे मानधन आद्यपही मिळाले नाही. मात्र इतर तालुक्यात हे मानधन त्याच दिवशी देण्यात आले आहे. त्यामुळे त्यांचे मानधन लवकरात लवकर मिळावे अशी मागणी उरण तालुका प्राथमिक शिक्षक समन्वय समितीने उरण तहसीलदार यांना केली आहे.

निवेदन स्वीकारतेवेळी नायब तहसिलदार संदीप खोमणे, शिक्षक सेना कोकण विभाग कार्याध्यक्ष कौशिक ठाकूर, सरचिटणीस हितेंद्र म्हात्रे, शिक्षक संघाचे महेंद्र गावंड, महेश गावंड, नरेश म्हात्रे, विश्वनाथ पाटील आदी उपस्थित होते.

## माणगाव येथे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ न्यायालय होणार स्थापन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

मा.मुंबई उच्च न्यायालयाने माणगाव येथे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर न्यायालय सुरू करण्याकरिता नुकतीच तत्वतः मान्यता दिली आहे. त्यामुळे बार असोसिएशनचे पदाधिकारी, सदस्यांच्या व सर्वसामान्य पक्षकारांच्या मागणीला न्याय मिळाला आहे.

पालकमंत्री कु.आदिती तटकरे व खासदार सुनिल तटकरे, आमदार अनिकेत तटकरे यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. खासदार सुनिल तटकरे यांनी ते स्वत: वित्त मंत्री, जलसंपदा मंत्री तथा नगरविकास मंत्री असताना माणगाव येथे जिल्हा न्यायालय स्थापन करण्यासाठी अथक परिश्रम घेतले होते. त्यांच्या प्रयत्नांमुळेच माणगाव जिल्हा न्यायालयाची इमारत व माणगाव येथे जिल्हा न्यायालय सुरू झाले.

जिल्ह्यातील महाड, पोलादपूर, श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव, तळा, रोहा व पाली या तालुक्यांकरिता जिल्हा व सत्र न्यायालयाची स्थापना सन २००८ मध्ये करण्यात आली होती. माणगाव येथे जिल्हा न्यायालय व दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर न्यायालयांचे कामकाज चालविण्यात येते. मात्र दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर न्यायालय हे महाड येथे कॅम्पव्दारा चालविण्यात येत आहे.

त्यामुळे महाड येथे न्यायालयीन प्रकरणांविषयी कार्यवाही करावयाची असेल तर श्रीवर्धन, म्हसळा, तळा व माणगाव या तालुक्यांतील पक्षकारांना प्रकरण दाखल करण्यासाठी अलिबाग येथे जावे लागत होते. त्याचप्रमाणे अलिबाग येथे जाऊन प्रकरण दाखल करणे हे गोरगरीब पक्षकारांना सोईचे नव्हते, ते खर्चिक व अतिशय त्रासदायक होते. त्याचप्रमाणे रोहा व पाली-सुधागड येथील तालुक्यांतील पक्षकारांना दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या आदेशाविरूध्द अपिल माणगाव जिल्हा व सत्र न्यायालयात दाखल करता येत होते, मात्र दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर न्यायालयाकरिता त्यांना अलिबाग येथे जावे लागत होते, तेही अतिशय त्रासाचे व खर्चाचे होते.

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर न्यायालयामध्ये रू.५ लाख मूल्य असलेल्या रक्कमेचे दावे चालविण्यात येतात. रू. पाच लाखापेक्षा जास्त मूल्य असलेल्या रक्कमेचे दावे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर न्यायालयात चालविले जातात. माणगाव, रोहा, श्रीवर्धन, म्हसळा, तळा व पाली या तालुक्यात मोठ्या प्रमाणावर शासनामार्फत औद्योगिक वसाहती निर्माण करण्यात आलेल्या आहेत, त्यामुळे जमिनीच्या किंमती मोठ्या प्रमाणावर वाढून शासनाविरूध्द असलेले दावे, तसेच मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गातील संपादनाचे वाद हे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर न्यायालयामध्ये दाखल होतात. या सर्व बाबी पहाता माणगाव हे सर्व दृष्टीने मध्यवर्ती व सोईस्कर असल्याने तसेच येथे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर न्यायालय सुरू करण्यासाठी आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा उपलब्ध असल्याने हेच ठिकाण योग्य होते.

## खारघरमध्ये तरुणावर गोळीबार करणारे ३ आरोपी अटकेत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पेण येथून नवी मुंबईत फिरण्यासाठी आलेल्या प्रतीक रवींद्र आहेर (२४) या तरु-णावर शनिवारी रात्री खारघर येथे गोळीबार करुन फरार झालेल्या चारही आरोपींना अटक करण्यात खारघर पोलिसांना यश आले आहे. विपीन शैलेंद्र ठाकुर (१९), गोपाल ननु सिंह (२३), अभिनंदनकुमार गणेश शर्मा (२३) आणि मुचन नागेंद्र ठाकुर (१९) अशी या आरोपींची नावे असून त्यांनी लुटमारीच्या उद्देशाने प्रतीक आहेर याच्यावर गोळीबार केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. अशा प्रकारे लुटमारी करुन मिळालेल्या पैशातून हॉटेल सुरु करण्याची या तरुणांची योजना असल्याचे तपासात आढळुन आले आहे. पोलिसांनी या आरोपींकडून रिव्हॉल्वर व जिवंत काडतुस जफ्त केले आहे.

या आरोपींच्या गोळीबारात जखमी झालेला प्रतीक आहेर हा तरुण पेण शहरात राहण्यास असून तो शनिवारी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास पेण येथून मेस्ट्रो या मोटारसायकलवरून नवी मुंबईत फिरण्यासाठी आला होता. त्यानंतर रात्री १० वाजण्याच्या सुमारास तो वाशी येथून सायन पनवेल हमार्गे घरी जात असताना, रियान शाळे समोरील रस्त्यावर सिगरेट ओढण्यासाठी गेला होता. याचवेळी त्या ठिकाणी आलेल्या तिघा आरोपींनी प्रतिककडे मोबाईल, पैसे व त्याच्या मोटरसायकलच्या चावीची मागणी केली. मात्र प्रतिकने त्यांना नकार दिल्याने एकाने प्रतीक जवळचा मोबाईल फोन जबरदस्तीने खेचण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे प्रतीकने त्यांना विरोध केल्यानंतर त्यातील एका आरोपीने प्रतीक आहेर याच्या डाव्या पायाच्या मांडीवर आपल्याकडील रिवॉल्वरने एक गोळी झाडली होती. या गोळीबारात प्रतिक जखमी झाल्यानंतर तिघा आरोपींनी त्या ठिकाणावरुन पलायन केले होते. या घटनेची माहिती मिळ्यानंतर खारघर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमी प्रतीक आहेर याला प्रथम खारघर मधील सिटी हॉस्पिटल व त्यानंतर कामोठे येथील एमजीएम हॉस्पिटलमध्ये उपचारार्थ दाखल केले. त्यानंतर पोलिसांनी गोळीबार करणाऱ्या आरोपींवर गुन्हा दाखल करुन त्यांचा शोध सुरु केला होता. त्यासाठी पोलिसांनी खारघर परिसरातील सर्व सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. मात्र त्यांना त्यातून काहिच माहिती मिळाली नाही. अखेर पोलिसांनी कोपरा गावातील एकमेव कॅमेरा तपासला असता, त्यात गोळीबार झाल्याच्या वेळेत ४ तरुण निदर्शनास आले. सदर तरुणांबाबत पोलिसांनी अधीक माहिती घेतली असता, एक दिवसापुर्वीच तेथील चाळीमध्ये ४ तरुण राहाण्यासाठी आल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्या भागात सापळा लावून त्याठिकाणी आलेल्या दोघा तरुणांना ताब्यात घेतले. त्यानंतर परिमंडळ-१ चे पोलीस उपआयुक्त सुरेश मेंगडे यांनी दोन्ही तरुणांकडे अधीक चौकशी केली असता, त्यांनी प्रतीकला लुटण्यासाठी त्याच्यावर गोळीबार केल्याची कबुली दिली. त्यानुसार पोलिसांनी दोघांना अटक करुन त्यांच्या इतर दोघा साथिदारांना देखील अटक केली. तसेच त्यांनी ज्या रिव्हॉल्वर मधुन गोळीबार केला, ते रिव्हॉल्वर व जिवंत काडतूस देखील जफ्त केले. या आरोपींनी गोळीबार करुन लुटमारी करुन मिळालेल्या रक्कमेतून हॉटेल सुरु करण्याची योजना आखल्याचे त्यांच्या चौकशीतून निष्पन्न झाले आहे. सदरची कामगीरी महिला पोलीस निरीक्षक विमल बिडवे, सहाय्यक पोलीस निरीक्षक पढार, मानसिंग पाटील, पोलीस उपनिरीक्षक नरेंद्र बेलदार,गुहाने आदींच्या पथकाने केल्याची माहिती वरीष्ठ पोलीस निरीक्षक शत्रुघ्न माळी यांनी दिली.

## भाजप रायगड जिल्हा महिला चिटणीस सरोज म्हशीलकर राष्ट्रवादीत

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यातील भारतीय जनता पार्टीच्या रायगड जिल्हा महिला चिटणीस सरोज म्हशीलकर आणि त्यांचे पती रायगड जिल्हा कार्यकारणी सदस्य मंगेश म्हशीलकर यांनी म्हसळा येथे रा.काँ.पक्षाचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष मुसद्दीक इनामदार यांचे निवासस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा रायगड जिल्ह्याचे खासदार सुनिल तटकरे व राज्यमंत्री तथा पालकमंत्री आदिती तटकरे यांचे उपस्थित राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.



यावेळी त्यांचे सोबत अन्य सहकारी उपस्थित होते. यावेळी म्हशीलकर पती - पत्नीचे खासदार सुनिल तटकरे यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात स्वागत केले.

पक्षप्रवेश कार्यक्रम वेळी प्रदेश कार्यकारिणी चिटणीस अलिशेठ कौचाली, रायगड जिल्हा कृषी व पशुसंवर्धन समिती सभापती बबन मनवे, तालुका अध्यक्ष समीर बनकर, नगराध्यक्षा जयश्री कापरे उपनगराध्यक्ष सुहेब हलदे, गट नेते संजय कर्णिक, शहर अध्यक्ष रियाझ घराडे, जिल्हा उपाध्यक्ष मुसद्दीक इनामदार, उपाध्यक्ष शाहिद उकये यांचे सह नगरसेवक, नगरसेविका व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.


# पनवेल महानगरपालिका
## जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेवून उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडांचा प्रकार व संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १ | श्री.अमनदिप सिंह संधू, प्लॉट नं.C/८६, सेक्टर १२ एकता ॲवेन्यू जवळ, खारघर | १ जंगली | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं.C/८६, सेक्टर १२ एकता ॲवेन्यू जवळ, खारघर येथील १ जंगली झाड हे सदर घराच्या कंपाऊंड वॉलचे नुकसान होवू शकते. तरी सदरच्या झाडामुळे वित्तहानी होण्याची शक्यता असल्याने सदरचे १ जंगली झाड तोडणी करणेकामी परवानगी मिळणेबाबत. |
| २ | श्री.किशोर धाडीया, मिलेनियम ग्रुप, प्लॉट नं.१४०, सेक्टर १ (S) नवीन पनवेल | २ जंगली | पनवेल महानगरपालिका हद्दीतील मिलेनियम ग्रुप, प्लॉट नं.१४०, सेक्टर १ (S) नवीन पनवेल यांनी फायर वाहनाला आत आणि बाहेर जाण्यासाठी अडचण निर्माण होण्याची शक्यता असल्याने वृक्ष क्र.१ (ए विंग गेटसमोर येणारे) व वृक्ष क्र.७ (बी विंग गेटसमोर येणारे) अशी सदरची २ जंगली झाडे तोडणी करणेकामी परवानगी मिळणेबाबत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सूचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

जा.क्र.पमपा/वृ.पा./३९/२०२१
दिनांक : २५/०१/२०२१

सही/-
सहा आयुक्त
तथा
वृक्ष प्राधिकरण
पनवेल महानगरपालिका